# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०१९ दि. २४ डिसेंबर,२०१९

जळगाव दि. २४ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित विभाग आणि रामराव आदिक अभियांत्रिकी महाविद्यालय,नवी मुंबई यांच्या संयुक्तविद्यमाने दि.२३ ते २८ डिसेंबर या कालावधीत 'सायलॅब प्रमाणपत्र' अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभ्यास वर्गाचे उदघाटन बायोकेमेस्ट्रि विभाग प्रमुख प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याहस्ते करण्यात आले. पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख प्रा.एस.टी. इंगळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर.चौधरी, अभ्यास वर्गाचे प्रमुख वक्ते रामराव आदिक अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ.नरेंद्रकुमार दसरे, डॉ.प्रीतम वाणी हे उपस्थित होते. प्रास्ताविक अभ्यास वर्गाचे समन्वयक प्रा.किशोर पवार यांनी केले. सूत्रसंचालन कु.इरम खान हीने केले. डॉ.चिंतामण आगे यांनी आभार मानले. हा अभ्यासक्रम पुढील भविष्यातील संधीसाठी उपयोगी ठरणार आहे. वर्गास ५० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले आहेत.

---

दि. २४ डिसेंबर, २०१९

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.२४ (          ) क्रीडा महोत्सव-२०१९ करीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ सोलापूर येथे रवाना.

पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर सोलपूर विद्यापीठ, सोलापूर येथे दि.२६ ते ३० डिसेंबर या कालावधीत आयोजित क्रीडा महोत्सव-२०१९ मध्ये भाग घेण्यासाठी विद्यापीठाचा कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, मैदानी, हॅन्डबॉल क्रीडा प्रकाराचे पुरुष व महिला संघ सोलापूर येथे रवाना झाले. एकूण १४० खेळाडूं या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यावेळी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र.कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, दिपक पाटील, प्राचार्य एल.पी.देशमुख, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी खेळाडूंना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

-----------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-क्रीडा/हस्तदेय/२०१९ दि.२४ जुलै, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
----------------------
महोदय,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी